International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# पंढरपूर तीर्थक्षेत्र आणि विकासात्मक योजना

**श्रीकांत संदिपान दरगुडे[१] , डॉ.अशोक विश्वनाथ घोरपडे[२]**

*[१]संशोधक विद्यार्थी, न्यू आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज,अहिल्यानगर जि.अहिल्यानगर*

*[२]संशोधक मार्गदर्शक, न्यू आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, पारनेर जि.अहिल्यानगर*

*Corresponding Author – श्रीकांत संदिपान दरगुडे*

**DOI - 10.5281/zenodo.18833456**

**सारांश:**

*पंढरपूर तीर्थक्षेत्र हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध असे तीर्थक्षेत्र आहे तीर्थक्षेत्राला भेटी देण्यासाठी दररोज हजारोंच्या संख्येने भाविक भक्त पंढरीमध्ये दाखल होतात. वर्षातून येणाऱ्या चार प्रमुख वारी एकादशीला तर भाविकांची संख्या लाखांच्या पटीत असते. त्यामुळे वारकरी भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाच्या वतीने मूलभूत सोयी सुविधा पुरविल्या जात आहेत. यामध्ये वारकऱ्यांसाठी निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, शुद्ध पाणीपुरवठा, आरोग्याच्या दृष्टीने मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार या माध्यमातून प्रत्येक सेवा सुविधा या तात्काळ उपलब्ध करून दिल्या जातात. त्याचप्रमाणे वारकऱ्यांसाठी विमा योजना, स्वच्छतेचे महत्त्व सांगणारी स्वच्छता दिंडी वारकऱ्यांना प्रवासासाठी सवलत, वारकरी महामंडळ नदी स्वच्छतेसाठी नमामि चंद्रभागा यासारख्या योजनांच्या माध्यमातून पंढरपूर तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत आहे. तसेच वारीचे महत्व विश्वाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचत आहे.*

**प्रस्तावना :**

चंद्रभागा नदीच्या तीरावर वसलेले पंढरपूर हे वारकरी साधू संतांचे माहेर घर आहे. महाराष्ट्रातून नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात चैत्र, आषाढ, कार्तिकी व माघ वारी वर्षातून येणाऱ्या या चारही वारी कालावधीमध्ये वारकरी भाविक भक्त पायी दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून राम कृष्ण हरी नामाचा जप करत महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेल्या पंढरी नगरीमध्ये पोहोचतात श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळया मध्ये लाखो लोकांचा जनसमुदाय असतो 700 ते 800 वर्षाची अनोखी परंपरा लाभलेल्या या पालखी सोहळ्याची शिस्त, सातत्य, व्यापकता आणि मनातला भक्ती भाव हा विश्वाच्या कौतुकाचा विषय झाला आहे. पंढरपूर वारी म्हणजे सामाजिक ऐक्य व संस्कृतीचा वारसा आहे. त्यामुळे पंढरपूर तीर्थक्षेत्र हे मानवी जीवनाच्या चिरंतन मूल्याचे व संस्काराचे आध्यात्मिक केंद्र बनले आहे. वारी काळामध्ये तीर्थक्षेत्राच्या दिशेने निघालेल्या वारकरी भाविकांना प्रवासामध्ये कोणत्याही प्रकारची अडचणी येऊ नये. याची खबरदारी शासन सातत्याने घेत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर पालखी सोहळयाच्या मुक्कामी व विश्रांतीच्या ठिकाणी भोजन व्यवस्था, पाणी पुरवठा, निवासाची सोय, विजेची सोय, तात्काळ आरोग्यसेवा, आपत्कालीन मदत केंद्रे यासारख्या मूलभूत सुविधा तत्परतेने देण्याचे काम शासनाच्या वतीने केले जात आहे. तसेच वारकऱ्यांच्या कल्याणासाठी विमा कवच, दर्शनासाठी टोकन प्रणाली, वारकरी महामंडळ, मोफत तीर्थ दर्शन, नमामि चंद्रभागा यांसारख्या कल्याणकारी योजना राबवून पंढरपुर

वारीला प्रोत्साहन देण्याचे काम शासनाद्वारे तत्परतेने केले जात आहे.

**अभ्यास विषयाचे महत्त्व:**

वारकरी संप्रदायाचे व अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या विठुरायाच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागातून संतांच्या दिंड्या व पालख्या पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येतात. प्रवासा दरम्यान भाविकांना येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी शासनाच्या वतीने सातत्याने सुयोग्य असे नियोजन व व्यवस्थापन केले जाते. पालखी सोहळ्यासोबत चालत असताना व मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी पिण्याचे शुद्ध पाणी, त्यांच्या भोजनाची व्यवस्था, निवास व्यवस्था, त्याचबरोबर स्नानगृहे, स्वच्छतागृहे यांची सोय केली जाते. प्रवासादरम्यान वारकरी भाविकांना थकवा जाणवल्यास सर्वतोपरी मोफत आरोग्याच्या सोयी सुविधा व आरोग्याचे किट उपलब्ध करून दिले जातात. अशा प्रकारच्या मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम शासनाद्वारे केले जाते. तसेच तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी व वारकऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. त्यामध्ये दर्शनासाठी लागणारा वेळ वाचविण्यासाठी टोकन प्रणालीचा विकास करण्यात आला आहे त्याचप्रमाणे तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी होणाऱ्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. त्याचबरोबर वारीची संपूर्ण माहिती मिळविण्यासाठी वारीविषयक मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. मुक्कामाच्या ठिकाणी होणारी अस्वच्छता व दुर्गंधी यांपासून भाविकांचे संरक्षण करण्यासाठी स्वच्छता दिंडी हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला जात आहे. प्रवासात अपघातग्रस्त घटना घडल्यास वारकऱ्यांसाठी आर्थिक मदत म्हणून वारकऱ्यांसाठी विमा योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच वारकरी प्रवासी वाहनांना वारी कालावधीत टोल शुल्क माफीचा निर्णय शासनाने घेतला आहे. पंढरपूर वारीसाठी निघालेल्या दिंड्यांना ठराविक रकमेचे अनुदान शासनाच्या वतीने दिले जाणार आहे. नमामी चंद्रभागा अभियानांतर्गत नदीकाठच्या वाळवंट परिसराची स्वच्छता करून नदीपात्र प्रदूषणमुक्त करण्यात येणार आहे. यासारख्या कल्याणकारी योजनांमुळे तीर्थक्षेत्राचा विकास होण्यास मदत होत आहे. त्याचबरोबर वारकऱ्यांना करावा लागणारा स्व:खर्चाचा आर्थिक भार ही कमी होताना दिसत असून पंढरपूर वारी यात्रेला प्रोत्साहन मिळत आहे. त्याचबरोबर वारीची व्यापकता किती भव्य दिव्य आहे याचे आकलन होण्यास मदत होत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. पंढरपूर तीर्थक्षेत्रासाठी शासनाच्या योजनांचा अभ्यास करणे.
2. पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या मूलभूत सुविधांचा अभ्यास करणे.
3. वारी काळातील अर्थकारण समजून घेणे.

**संशोधनाची गृहिते** :

1. पंढरपूर तीर्थक्षेत्रासाठी शासनाकडून योजना राबविल्या जात आहेत.
2. पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मूलभूत सुविधांचा विकास होत आहे.
3. वारी काळात मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे दुय्यम साधन सामग्रीवर अवलंबून असून दुय्यम स्रोत म्हणून पुस्तके, वर्तनमान पत्रे संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके व शासनाच्या अधिकृत संकेत स्थळाचा आधार घेण्यात आलेला आहे.

**पंढरपूर तिर्थक्षेत्रासंबंधी विकासात्मक योजना:**

**नमामी चंद्रभागा अभियान:**

केंद्र सरकारच्या नमामि गंगे या योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारच्या वतीने 2016 मध्ये नमामी चंद्रभागा मोहीम हाती घेण्यात आली आहे. 2017 मध्ये या मोहिमेसाठी केंद्र शासनाच्या वतीने 995 कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देण्यात आली आहे. चंद्रभागा नदी ही प्रदूषण मुक्त करणे हा या मागचा उद्देश आहे. चंद्रभागा नदीचे उगमस्थान असलेली भीमाशंकर ते पंढरपूर असा 552 किलोमीटर लांबीचा नदीपट्टा या अभियानाच्या माध्यमातून स्वच्छ व प्रदूषणमुक्त करण्यात येणार आहे. या अभियानाशी पुणे सातारा व सोलापूर या तीन जिल्ह्यांचा संबंध येतो त्याचबरोबर पाच नगरपालिका व दोन महानगरपालिकांच्या घनकचऱ्यांचे व्यवस्थापन ही या अभियानांतर्गत केले जाणार आहे. नदीकाठावरील कारखाने औद्योगिक वसाहती व उद्योगातून येणाऱ्या अस्वच्छ सांडपाण्याची नियोजन करण्यासाठी पंढरपूर ते उजनी, उजनी ते पुणे व पुणे ते भीमाशंकर असे तीन टप्पे करण्यात आले आहेत. नदी प्रदूषण मुक्ततेसाठी शास्त्रीय पद्धतीने काम करण्यात येत आहे.

**आरोग्याची वारी पंढरीच्या दारी:**

शेकडो किलोमीटर चा पायी प्रवास करून लाखो वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरी नगरीत दाखल होतात. प्रवासादरम्यान आलेल्या थकव्यामुळे त्यांच्या आरोग्यावर होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी व छोट्या-मोठ्या आजारांपासून त्यांचे संरक्षण व सुरक्षिततेसाठी शासनाने आरोग्याची वारी पंढरीच्या दारी हा उपक्रम हाती घेतला आहे. वारी काळात पालखी मार्गावर प्रति पाच किलोमीटर अंतरावर एक आपला दवाखाना अंतर्गत 258 दवाखाने तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आले होते. तसेच सुसज्ज अतिदक्षता विभाग निर्माण करण्यात आले होते. गर्दीच्या ठिकाणी आरोग्य सेवा देण्यासाठी बाईक ॲम्बुलन्स ची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच पालखी बरोबर चार आरोग्य पथके निरंतर सज्ज ठेवण्यात आली होती. दिंडीप्रमुखांकडे 5885 आरोग्य किट देण्यात आले होते या सर्व यंत्रणेद्वारे 15 लाख 12 हजार 774 वारकऱ्यांना विनामूल्य आरोग्य सेवा देण्यात आली.

**भक्तनिवास:**

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांच्या निवासाची उत्तम सोय व्हावी यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने 46 कोटी रुपये खर्च करून एकूण 225 खोल्यांची संख्या असणारे सुसज्ज भक्तनिवास बांधण्यात येत आहे. त्यामध्ये एकाच वेळेस 222 लोक भोजन करू शकतील असा भव्य हॉल आहे. कार्यालयीन कामकाजासाठी 16 खोल्यांची व कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी बारा खोल्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच दर्शनी बाजूस 34 गाळे त्याचबरोबर सुसज्ज अशा पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. व्हिडिओकॉन व वेदांता कंपनी यांच्यावतीने ही प्रत्येकी एक भक्तनिवास उभारण्यात आले आहे.

**आदर्श दिंडी:**

स्वच्छता व सुरक्षिततेला केंद्रस्थानी ठेवून प्लास्टिकचा वापर कमी करून प्लास्टिक मुक्त वारी करण्यासाठी व पर्यावरणीय हित साधण्यासाठी मंदिर समितीने वारी दिंड्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'हरित वारी' योजना हाती घेतली आहे. त्या माध्यमातून स्वच्छतेचे उत्कृष्ट नियोजन करणाऱ्या दिंडीस प्रथम पारितोषिक १ लाख रुपये,द्वितीय पारितोषिक 75 हजार रुपये, तृतीय पारितोषिक 50 हजार रुपये देण्यात येणार असून 'आदर्श दिंडी' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. वारकरी व स्थानिक नागरिकांची आरोग्य सुदृढता हा यामागचा हेतू आहे.

**आधुनिक स्वच्छता दिंडी:**

विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला निघालेल्या दिंड्यांना प्रवासामध्ये रात्रीच्या विश्रांतीसाठी विशिष्ट गावांमध्ये मुक्काम करावा लागतो, मुक्कामाच्या ठिकाणी एकाच वेळेस अचानक गर्दी वाढल्याने अस्वच्छता व दुर्गंधी वाढण्याची भीती असते, परंतु स्वच्छता दिंडीच्या माध्यमातून

दिंडीने मुक्कामी गाव सोडल्यानंतर बारा तासाच्या आत ते गाव पूर्णतः स्वच्छ केले जात आहे. त्यामुळे अस्वच्छता दुर्गंधी यातून निर्माण होणाऱ्या आजारावर व प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यास स्वच्छता दिंडी यशस्वी ठरत आहे. श्री संत ज्ञानेश्वर पालखी मार्गावर आठ व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर आठ चित्ररथांच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी एलईडी स्क्रीन चा वापर केला जातो. तसेच दोन्ही मार्गावर 225 ते 250 कलाकारांच्याद्वारे लोककलेच्या माध्यमातून स्वच्छतेविषयी प्रबोधन केले जाते. तसेच स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणाऱ्या सात ते दहा मिनिटाच्या फिल्मही तयार करण्यात आल्या आहेत. स्वच्छते विषयीच्या या जनजागृतीमुळे वारकरी व नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होत आहे.

**वारी काळातील गर्दी व्यवस्थापनासाठी AI (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) चा वापर:**

वारी कालावधीमध्ये होणाऱ्या लाखो भाविकांच्या गर्दीचे व्यवस्थापन आताAI टेक्नॉलॉजी द्वारे केले जाणार आहे. वारीकाळात गर्दी टाळण्यासाठी प्रशासनाच्या वतीने वारंवार सूचना दिल्या जातात परंतु गर्दी मात्र कायमस्वरूपी निदर्शनास येते वाढत्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी संभाव्य चेंगराचेंगरी कमी करण्यासाठी, अचानक उद्भवणारी संकटे व धोके टाळण्यासाठी AI टेक्नॉलॉजी चा वापर आता प्रभावी ठरणार आहे. त्यासाठी आवश्यक सॉफ्टवेअरची व निधीची मागणी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने सरकारकडे केली आहे. या टेक्नॉलॉजी मुळे गर्दीचे विभाजन करून भाविकांना सुरळीत व सुरक्षित दर्शन घेण्यास मदत होणार आहे.

**दर्शनासाठी टोकन व्यवस्था:**

विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आलेल्या हजारो भाविकांचे दर्शन कमीत कमी वेळेत जलद व सुलभ पद्धतीने व्हावे यासाठी तिरुपती बालाजी येथे ज्याप्रमाणे दर्शन टोकन पद्धतीचा वापर केला जातो त्याच धर्तीवर पंढरपूर येथेही आता बेंगलोरच्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस च्या माध्यमातून सेवाभावी तत्त्वावर विकसित केलेल्या दर्शन टोकन प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता वेळेची व श्रमाची बचत व्हावी व त्यांना आनंददायी दर्शनाचा लाभ घेता यावा हा यामागचा उद्देश आहे. या प्रणाली द्वारे भाविकांना निश्चित केलेल्या वेळेचे ऑनलाइन टोकन प्रिंट दिले जाते. त्यामुळे दर्शन रांगेत न थांबता हॉलमध्ये थांबवून टोकन प्रिंट वरील वेळेनुसार दर्शनासाठी प्रवेश दिला जातो यामुळे गर्दीचे व्यवस्थापन होण्यास मदत होत आहे. या प्रणालीचा लाभ घेण्यासाठी भाविकांना विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा लागणार आहे.

**मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना:**

महाराष्ट्र राज्यातील वय वर्ष 60 किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या सर्व धर्मीय ज्येष्ठ नागरिकास महाराष्ट्रातील व भारतातील निर्धारित केलेल्या तीर्थस्थळांना या योजनेअंतर्गत भेटी देता येणार आहेत. या दरम्यान येणारा प्रवास खर्च, भोजन खर्च तसेच निवासाचा खर्च शासनाद्वारे केला जाणार आहे. खर्चाची कमाल मर्यादा ही प्रतिव्यक्ती 30 हजार रुपये इतकी असेल. लाभार्थ्याचे वय 75 वर्षापेक्षा जास्त असल्यास अशा लाभार्थ्यास एक मदतनीस घेता येणार आहे. या योजनेचा लाभ घेणारा लाभार्थी हा ज्येष्ठ नागरिक असावा तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा. तसेच त्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखापेक्षा जास्त नसावे. पात्र व्यक्तीला या योजनेचा एक वेळा लाभ घेता येईल. या योजनेमध्ये भारतातील एकूण 73 व महाराष्ट्रातील पंढरपूर तीर्थक्षेत्रासह 66 तिर्थक्षेत्राचा समावेश आहे.

**मुख्यमंत्री वारकरी महामंडळ:**

वारकरी भाविक भक्त कीर्तनकार यांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडून 14 जुलै 2024 मध्ये मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. या

महामंडळाचे मुख्यालय हे पंढरपूर येथे असणार आहे. महामंडळाचा कारभार पाहण्यासाठी कार्यरत किंवा सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. महामंडळाची भाग भांडवल हे 50 कोटी रुपये इतके आहे लाखोच्या संख्येने पंढरपूर येथे वारीसाठी दाखल होणाऱ्या भाविक भक्तांना व वारकऱ्यांना येणाऱ्या समस्या अडचणी या महामंडळाच्या द्वारे सोडविल्या जाणार आहेत. वारकऱ्यांसाठी भोजन व्यवस्था राहण्याची सोय त्यांच्या आरोग्यासाठी मोफत औषध उपचार त्यांच्या जीविताची सुरक्षा तसेच आकस्मिक घटना घडल्यास विमा कवच इत्यादींसारख्या सोयी सुविधा व कल्याणकारी योजना राबविण्याचे काम या महामंडळाद्वारे केली जाणार आहे.

**अपघातग्रस्त वारकऱ्यांसाठी आर्थिक मदत:**

वारी काळामध्ये पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येणाऱ्या वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी विठ्ठल रखुमाई वारकरी योजना 2025 ही योजना महाराष्ट्र सरकारच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. वारीदरम्यान लाखो भाविक पंढरपूरला येतात प्रवासादरम्यान दुर्घटना घडून वारकऱ्याचा मृत्यू झाल्यास शासनाकडून 4 लाख रुपयांची मदत त्यांच्या वारसांना देण्यात येणार आहे. तसेच 60% पेक्षा जास्त अपंगत्व वारकऱ्यांवर ओढावल्यास जखमी वारकऱ्यास 2.5 लाख रुपये तर 60 टक्के पेक्षा कमी अपंगत्व आलेल्या वारकऱ्यास 74 हजार रुपये तात्काळ आर्थिक मदत म्हणून शासनाकडून देण्यात येणार आहे.

**वाहनांसाठी टोल शुल्क माफी:**

पंढरीच्या वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांच्या वाहनांना टोलमाफी करण्याचा निर्णय शासनाद्वारे घेण्यात आला आहे. वारकऱ्यांची वाहतूक करणारी वाहने अतिरिक्त एमएसआरटीसी बसेस व 10 पारंपारिक मानाच्या पालख्या सोबत असणारी वाहने यांना सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या टोलप्लाजावर टोल शुल्क भरावे लागणार नाही.

**सर्वसमावेशक वारी मोबाईल ॲप**:

पंढरपूरला येणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी वारी विषयीची सर्वसमावेशक माहिती केव्हाही, कोठेही, कधीही उपलब्ध होण्यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'आषाढी वारी २०१८' मोबाईल ॲप वारकऱ्यांचा सारथी! या नावाने विकसित करण्यात आले आहे. या ॲपद्वारे श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीच्या पायी दिंडी प्रवास मार्गा विषयी माहिती मिळेल तसेच प्रशासकीय अधिकारी, दिंडी प्रमुख, आपत्कालीन मदत केंद्रांचे संपर्क नंबर मिळवता येतील. आरोग्य व्यवस्था, भोजन व्यवस्था, निवास व्यवस्था यांची माहिती मिळण्यास मदत होईल. विठ्ठल रुक्मिणी लाईव्ह दर्शन वाहतूक व्यवस्था 'सेल्फी वुईथ पालखी ' गर्दीत हरवलेल्यांसाठी आपण यांना पाहिलंत का? या फिचरचा वापर करुन हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेण्यास मदत होणार आहे. एवढेच नव्हे तर परदेशातील भाविक सुद्धा या ॲप चा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहेत.

**तीर्थक्षेत्र विकास आराखडा:**

सोलापूर जिल्ह्यासाठी 467 कोटी रुपयाचा तीर्थक्षेत्र आराखडा तयार करण्यात आला आहे त्या माध्यमातून पंढरपूर शहर व ग्रामीण भागासाठी 85 कामांना मान्यता देण्यात आली आहे त्यापैकी 43 कामे पूर्ण झाली असून 27 कामे पूर्णत्वाच्या दिशेने आहेत वारकऱ्यांच्या सोयीसाठी दगडी पुलाजवळ 65 एकर जागेवर रस्ते सुधारणा, विजेची सोय, पाणी पुरवठा,११०० स्वच्छतागृहे तसेच हाय मास्ट दिवे यासारख्या मूलभूत सेवांची पूर्तता करण्यात आली आहे. पंढरपूर शहरांतर्गत व पालखी मार्गावरील रस्ते विकास करण्यात आला. असून चंद्रभागा नदीच्या तीरावर 850 मीटर लांबीच्या घाटाचे बांधकाम सुरू आहे.

**निष्कर्ष:**

पंढरपूर तीर्थक्षेत्रासाठी शासनाच्या वतीने करण्यात येणारा पायाभूत विकास तसेच राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांमुळे येणाऱ्या काळात तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांचा ओढा आणखीनच वाढणार आहे. सहाजिकच त्या माध्यमातून धार्मिक पर्यटनास चालना मिळण्यास मदत होत आहे. वाढत्या भाविकांच्या संख्येमुळे तेथील आर्थिक उलाढाल वाढत आहे. छोट्या मोठ्या विक्रेते व्यवसायिकांच्या उद्योग व व्यवसायात वाढ होऊन पंढरपूर तीर्थक्षेत्र व आसपासच्या बाजारपेठांना आर्थिक महत्त्व प्राप्त होत आहे. स्थानिक च्या लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. तसेच स्थानिक नागरिकांच्या राहणीमानात सुधारणा होताना दिसत आहे. रस्ते, वीज, पाणी, आरोग्य घाट, बांधकाम, सुलभ स्वच्छतागृहे निवास व्यवस्था यांसारख्या सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या वतीने आर्थिक निधीची तरतूद केली जात आहे. तसेच वारकऱ्यांच्या हितासाठी कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत त्या माध्यमातून वारकऱ्यांच्या सुरक्षिततेची व आरोग्याची काळजी घेतली जात आहे, वारी दिंडयांना अनुदान दिले जात आहे, आधुनिक पद्धतीने गर्दीचे नियोजन केले जात आहे तसेच पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी तीर्थक्षेत्र आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस वारी अधिक सक्षम होत चाललेली आहे व भाविकांनाही प्रोत्साहन मिळत आहे.

**संदर्भ :**


1. https://www.mahasamvad.in
2. https://www.lokmat.com
3. https://pudhari.news
4. https://divyamarathi.bhaskar.com
5. English. lokshahi.com
6. लोकराज्य – ऑगस्ट-2018
7. उमा हर्डीकर – तीर्थाटन, मैत्रेय प्रकाशन, मुंबई-400 057
8. रामचंद्र देखणे - वारी स्वरूप आणि परंपरा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे
9. वि. रा. भिंताडे - शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्य-नूतन प्रकाशन, पुणे